ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १७ जून, १९६४ | अंक १८

## विविध माहिती

**पुण्याच्या भोंवतालीं रस्ता**—पुण्यांतून जाणाऱ्या ५ राजमार्गांना जोडणारा २८ मैल लांबीचा एक वर्तुळाकार रस्ता बांधण्यांत येणार आहे. सध्यां बाहेरगांवाहून पुण्याला येणारी वाहतूक आणि बाहेर पडणारी वाहतूक इतकी वाढली आहे कीं शहरांतील रस्ते वाहनांच्या गर्दीनें दाटून जात असतात. नवा रस्ता झाल्यावर शहरांतील रस्त्यावरील आणि आसमंतांतील औद्योगिक विभागांतील गर्दी बरीच कमी होईल. संकलिपत नव्या रस्त्यांपैकी १२ मैलांचा रस्ता प्रथम बांधण्यांत येईल, व त्यासाठी २० लाख रुपये खर्च येईल.

**पं. नेहरूंविषयीं प्रदर्शन**—येत्या सप्टेंबर महिन्यांत न्यूयॉर्कमध्यें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांत दिवंगत पंतप्रधान पं. नेहरू ह्यांच्याविषयींचीं छायाचित्रें मांडण्यांत येणार आहेत. पं. नेहरूंचीं छायाचित्रें, त्यांचें लिखाण आणि भाषणें, त्यांच्याविषयीं इतर ग्रंथकारांनीं लिहिलेलीं पुस्तकें, इत्यादि साहित्य आणि संबंधित छायाचित्रें प्रदर्शनांत मांडण्यांत येतील. प्रे. केनेडी ह्यांच्या जीवनाची व त्यांच्या कार्याची कल्पना देणारें असेच एक प्रदर्शन सध्यां जागतिक प्रदर्शनांत भरविण्यांत आलें आहे.

**सुवर्णकारांचें पुनर्वसन**—सुवर्णनियंत्रण जारी करण्यांत आल्यापासून सुवर्णकारांना स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें ३·५ कोटी रुपयांची तरतूद केली. देशांतील ३ लाख सुवर्णकारांपैकी २ लाख सुवर्णकारांनीं सोन्याचे दागिने दुरुस्त करण्यासाठी परवाने मिळावे म्हणून अर्ज केलेले आहेत. ४० हजार सुवर्णकारांची व्यवस्था लावण्यांत आली असून त्यांच्यापैकी ९ हजारांना नौकऱ्या देण्यांत आल्या आहेत.

**गुजरात स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशनला नफा**—१९६४ च्या मार्च अखेर संपणाऱ्या आर्थिक वर्षांत गुजरात स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशनला ५·८७ लाख रुपये नफा झाला आहे. कॉर्पोरेशनला नफा होऊं लागल्यामुळें त्याला देण्यांत येणारी मदत निम्म्यानें कमी करण्यांत आली आहे. कॉर्पोरेशनची ३॥ टक्के नफ्याची हमी आहे.

**धरणाचें नव्यानें नामकरण**—सौराष्ट्रांत शत्रुंजी नदीवर धरण बांधून शेताला पाणीपुरवठा करण्याची सोय करण्यांत आली. हें धरण सौराष्ट्रांत सर्वांत मोठें असून त्यासाठी ७ कोटी रुपये खर्च आला आहे. धरणाचा पाया भारताचे पंतप्रधान पं. नेहरू ह्यांच्या हस्तें घालण्यांत आला होता. धरण १९६२ सालीं पूर्ण झालें. आतां शत्रुंजी धरण ह्या नांवाऐवजी जवाहरलाल धरण असें नांव त्याला देण्यांत येणार आहे.

**नेपाळला पश्चिम जर्मनीची मदत**—नेपाळच्या सरकारनें पश्चिम जर्मनीकडून दोन कामासाठी मदत मिळविण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. नेपाळच्या तराई विभागांत पूर्व-पश्चिम दिशेनें जाणाऱ्या एका रेल्वे मार्गासाठी आणि १०० किलोवॅट शक्तीचा ध्वनिक्षेपक उभारण्यासाठी ही मदत मागण्यांत येत आहे. जर्मनीकडून ह्या मागणीला साद मिळेल अशी अपेक्षा आहे. लवकरच दोन जर्मन एंजिनिअर्स प्राथमिक पहाणीसाठी नेपाळला येणार आहेत.

**स्त्रियांच्या आत्मघातांबद्दल चौकशी**—गुजरात राज्यांत स्त्रियांच्या आत्महत्येचें प्रमाण अधिक आहे. त्यांच्या आत्महत्येच्या कारणांची आणि त्याविरुद्ध करावयाचे उपाय ह्यांची चौकशी करण्यासाठी गुजरात सरकारने एक कमिटी नेमली आहे. कमिटींत १४ सभासद आहेत.

**लडाख विभागाचा विकास**—लडाख विभागाचा विकास साधण्यासाठी एक योजना तयार करण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठी चालू वर्षांत ५८·२९ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. विकासाच्या कामांत पाणीपुरवठ्याच्या योजना, गवती जमिनीची सुधारणा आणि बटाट्यांच्या बियाण्यांचें केंद्र ह्यांचा समावेश आहे.

**खिस्तीन कीलरची सुटका**—गेल्या वर्षीं ब्रिटनच्या युद्धमंत्र्याच्या स्थानभ्रष्टतेला आणि नंतर आत्महत्येला कारणीभूत होणाऱ्या खिस्तीन कीलर ह्या वेश्येची तुरुंगांतून सुटका झाली आहे. खोटी साक्ष दिल्याबद्दल तिला ९ महिन्यांची शिक्षा झाली होती. युद्धमंत्री मि. प्रोफ्युमो ह्यांनीं तिच्याशीं आपलें रहस्य असल्याचें प्रथम नाकारलें होतें. कीलर ही रशिआची हेर असल्याचें आढळून आलें होतें.

**सागरी संशोधन-शाळा**—भारतांत शास्त्रीय मनोवृत्तीला उत्तेजन देण्याचें कार्य पं. नेहरू ह्यांनीं केलें असल्यामुळें त्यांची स्मृति जागी ठेवण्यासाठी केरळ राज्यांत एक सागरी संशोधन-शाळा स्थापन करण्यांत यावी, अशी सूचना करण्यांत आली आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेंत समुद्रापासून मिळणाऱ्या संपत्तीला महत्त्वाचें स्थान आहे.

**जेमिनी सर्कसच्या तंबूला आग**—जेमिनी सर्कसचा प्रयोग लखनौ येथें चालू असतांना सिगारेटचें जळतें थोटुक कुणीतरी निष्काळजीपणानें फेकल्यामुळें ३१ मे रोजीं तंबूला आग लागली. त्यामुळें तंबू जळून जाऊन सुमारें २ लक्ष रु. चें नुकसान झालें. सर्कसच्या व्यवस्थापकांच्या प्रसंगावधानामुळें कुणासहि इजा झाली नाहीं.

## लोखंडाच्या उत्पादनासाठी जपानची मदत

जपानमधील पोलादाच्या धंद्याचें एक प्रतिनिधिमंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें आहे. मंडळाचे पुढारी मद्रास येथें पत्रकारांशीं बोलतांना म्हणाले कीं, दरसाल १ लाख टन विडाचें लोखंड तयार करूं शकणाऱ्या कारखान्यांच्या उभारणीसाठी जपान भारताला तांत्रिक साह्य देऊं शकेल. कारखाने, खाजगी मालकीचे असावेत कीं सार्वजनिक मालकीचे असावेत हा अर्थात् भारताचा प्रश्न आहे. कमी प्रतीच्या कोळशाचा उपयोग करून विजेच्या साह्यानें लोखंड तयार करण्याचें तंत्र जपानला अवगत आहे. लोखंडाच्या खनिजाची प्रत, चुनखडीच्या दगडाची प्रत आणि कोळशाची प्रत ह्यांवर कारखान्यासाठी येणारा खर्च अवलंबून आहे. परंतु, साधारण मानानें अशा प्रत्येक कारखान्यास ३ ते ३॥ कोटी रुपये भांडवल घालावें लागेल. भारतांत सध्यां कच्च्या लोखंडाची चणचण बरीच भासत आहे. ती दूर करण्याच्या दृष्टीनें १ लाख टन निर्माणक्षमता असणारे ८ कारखाने काढण्यासाठी मंडळ पाहाणी करीत आहे. अशा प्रकारचा एक कारखाना आंध्र राज्यांत कोढागुडम् येथें काढतां येण्यासारखा आहे. त्याशिवाय गोव्यांत चार ठिकाणीं, एक पंजाबांत, एक मद्रास राज्यांत आणि एक पश्चिम बंगालमध्यें काढतां येणें शक्य आहे. कारखाने काढण्यासाठी लागणारें तांत्रिक ज्ञान जपानजवळ आहे. परंतु पैसा मात्र जपान पुरवूं शकणार नाहीं. म्हणून भारत सरकारनें जपानच्या सरकारकडे बोलणीं करून कारखान्यांच्या उभारणीसाठी लागणारीं दीर्घ मुदतीचीं कर्जें मिळविण्याचा प्रयत्न करावा. पैशाची व्यवस्था झाल्यास कारखाने निघूं शकणें अवघड नाहीं.

---

## शुगर मार्केटिंग कॉर्पोरेशनसंबंधीं इशारा

भारत सरकारनें साखरेचें वांटप करण्यासाठी शुगर मार्केटिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या निर्णयाला अनुसरून इंडियन शुगर मिल्स असोसिएशननें आपली कैफियत सरकारकडे सादर केली आहे. असोसिएशनचें म्हणणें असें आहे कीं, अशा प्रकारची संघटना स्थापन केल्यानें साखरेचें उत्पादन वाढण्यास प्रतिकूल परिस्थिति निर्माण होईल. आतांपर्यंतचा अनुभव असा आहे कीं, सरकारनें ज्या ज्या वेळीं साखरेच्या धंद्यावर नियंत्रणें बसविलीं त्या त्या वेळीं साखरेच्या उत्पादनांत घट झालेली आहे. ह्या वर्षाच्या हंगामांत साखरेचें उत्पादन ३३ लाख टन होईल असा अंदाज करण्यांत आला होता. परंतु प्रत्यक्ष उत्पादन २६ लाख टनांपेक्षा फारसें अधिक होईल असें वाटत नाहीं. शुगर मार्केटिंग कॉर्पोरेशनच्या स्थापनेमुळें साखरेच्या नियंत्रित वांटपाची व्यवस्था कायम स्वरूपाचीच होऊन बसेल, आणि त्यामुळें नियंत्रणाच्या पाठोपाठ येणाऱ्या वाईट गोष्टीहि कायमच्या रुजतील. साखरेच्या किरकोळ वांटपाची व्यवस्था कॉर्पोरेशन स्वतःकडे घेणार नाहीं हें सरकारी प्रवक्त्यांनीच स्पष्ट केलेलें आहे. अशा परिस्थितींत साखरेच्या वांटपाची व्यवस्था पहाणाऱ्या पहिल्या मंडळाच्या ऐवजीं कॉर्पोरेशन तेंच काम करूं लागेल. त्यामुळें त्याच्या कारभारविषयक खर्चाचा नवा बोजा ग्राहकावर कायमचाच ठेवावा लागेल. तेव्हां ह्या नव्या वांटपव्यवस्थेनें ग्राहकांचा फायदा होण्याचा संभव नाहीं. साखरेच्या धंद्याविषयीं सरकारनें पाठपुरावा केलेल्या धोरणाचा फेरविचार करण्याची पाळी आतां आली आहे.

---

प्रगतीच्या आघाडीवर

दि बेळगांव बँक लिमिटेड

'बँकिंगच्या' प्रगतीच्या आघाडीवर राहण्याचा, विशेषतः जेथें मोठ्या बँकांना विशिष्ट स्थानिक परिस्थितीशीं समरस होऊन तेथील जनतेच्या गरजा-आकांक्षांना अनुसरून काम करणें केवळ अशक्य आहे, अशा प्रादेशिक क्षेत्रांत आघाडीवर असण्याचा दि बेळगांव बँक लि. चा सतत प्रयत्न आहे.

आम्हीं अभिमानपूर्वक असें कां व कसें म्हणूं शकतों, तें प्रत्यक्षच येऊन पाहा !

खरोखर एखाद्या उत्कृष्ट बँकेंत जें जें अपेक्षित आहे, तें तें सर्व

दि
बे ळ गां व
बँ क
लि मि टे ड

मध्येंहि आपणांस खास अनुभवास येईल; आमच्याकडे थोडा व्यवहार करून प्रचीति पाहा !

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

म्हैसूर आणि महाराष्ट्रांत ३३ शाखा

महाराष्ट्रांतील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

संस्थापक : प्रा. ग. कृ. भोपटकर, एफ्. सी. आय.
स्थापना : १९१८ ] [ टेलिफोन नं. २२३६०
७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणें २.

जी. सी. डी., डी. कॉम., एल. सी. सी., जी. डी. सी. ॲन्ड ए. सी. ए. आय. आय. बी., ए. आय. सी. डब्ल्यू. ए. (कॉस्टिंग), भारत सरकारच्या कंपनीच्या सेक्रेटरी परीक्षा, लायसेन्शिएट इन्शुअरन्स परीक्षा, शॉर्टहँड, इंग्रजी-मराठी टाईपरायटिंग, पुणें विद्यापीठाच्या एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स व बी. कॉम. डिग्री कोर्स आणि इन्स्टिटयूटचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

२९ जून, १९६४ पासून वर्ग सुरू होतील

— खास वैशिष्ट्यें —

★ सकाळ-संध्याकाळचे वर्ग.
★ इंग्रजी-मराठींतून अध्यापनाची सोय.
★ जी. सी. डी., व जी. डी. सी. ॲंड ए., कोर्सेससाठी वार्षिक रु. १२०० च्या आंत उत्पन्न असलेल्या गरीब विद्यार्थ्यांसाठीं सरकारी फ्रीशिप्स.
★ एस्. एस्. सी., अंडर-ग्रॅज्युएटस् व ग्रॅज्युएटस् अशा सर्वांना योग्य असे अभ्यासक्रम.
★ बँकेंत नोकरी करणाऱ्या वा नोकरी करूं इच्छिणाऱ्यासाठी ३ महिन्यांचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.
★ बी.कॉम्.एक्स्टर्नल डिग्रीच्या अभ्यासाची संपूर्ण सोय.

# अर्थ

बुधवार, १७ जून, १९६४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


### निर्यातीमुळें होणाऱ्या प्राप्तींत वाढ

भारत सरकारच्या व्यापारी माहिती आणि आकडे खात्यानें भारताच्या १९६३-६४ च्या निर्यातीसंबंधी माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यावरून असें दिसतें कीं, संबंधित वर्षात भारतानें एकूण ७६२·९३ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला. त्यामागील वर्षाच्या मानानें निर्यातीमुळें झालेल्या उत्पन्नाचा आकडा ८४·७९ कोटी रुपयांनीं अधिक आहे. नेहमींप्रमाणें ब्रिटनला केलेल्या निर्यातीमुळें भारताला सर्वांत अधिक प्राप्ति झाली. ब्रिटनला केलेल्या निर्यातीमुळें भारताला १६०·७१ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळालें. १९६२-६३ सालीं केलेल्या निर्यातीमुळें १६२·२७ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळालें होतें. अमेरिकेला भारतानें केलेल्या निर्यातींत वाढ झालेली दिसून आली. १९६२–६३ सालीं भारतानें ११३·८१ कोटी रुपयांच्या मालाची निर्यात केली होती. १९६३-६४ सालीं १२८·३१ कोटी रुपयांचा माल निर्यात करण्यांत आला. सोव्हिएट रशिआला केलेल्या निर्यात मालाच्या किंमतींतहि वाढ झालेली आहे. १९६२–६३ सालीं ३७·९८ कोटी रुपयांचा माल रशिआला निर्यात करण्यांत आला होता. १९६३-६४ सालीं ५२·०९ कोटी रुपयांचा माल निर्यात करण्यांत आला. जपानला केलेल्या निर्यातीच्या मालाच्या किंमतींतहि अशीच वाढ झालेली आहे. गेल्या दोन वर्षांतील ह्यासंबंधीचे आकडे ३३·३७ कोटी रुपये व ५८·५५ कोटी रुपये असे आहेत. मलेशिआ आणि सिंगापूर ह्यांना निर्यात केलेल्या मालांत दुपटीनें वाढ झालेली आहे. ऑस्ट्रेलिआ, कॅनडा, सीलोन, संयुक्त अरब प्रजासत्ताक आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांना १९६३–६४ सालीं निर्यात केलेल्या मालांत मात्र १९६२–६३च्या तुलनेनें घट झालेली आहे. १९६२-६३ सालीं ह्या देशांना ६४·७९ कोटी रुपयांचा माल निर्यात करण्यांत आला होता.

---

### परदेशीय प्रवाश्यांच्या सोयीचीं हॉटेल्स

औद्योगिक विकास साधण्यासाठी भारताला परदेशीय भांडवलाची गरज मोठ्या प्रमाणावर भासत आहे. निर्यात व्यापार वाढवून आणि कर्जें वगैरे घेऊन ही गरज भागविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेतच. परदेशीय चलन मिळविण्याचा कांहींसा सोपा मार्ग म्हणजे परदेशीय प्रवाश्यांना भारताचा प्रवास आकर्षक करणें. परंतु परदेशीय पाहुण्यांना आकर्षित करण्यासाठी त्यांच्या सोयींची अधिक चांगली दखल घेणें आवश्यक आहे. भारतांत मजेनें प्रवासासाठी येणाऱ्या लोकांत प्रगत देशांतील लोकच अधिक असतात. त्यांच्या देशांतील राहणीचें मान भारतापेक्षा पुष्कळच उच्च दर्जाचें असल्यामुळें त्यांना येथील प्रवासाच्या सोयीसवलती निकृष्ट वाटल्यास नवल नाहीं. त्या सुधारण्याच्या दृष्टीनें प्रवासी हॉटेल्सच्या धंद्यांत परकीय भांडवल घेण्याची कल्पना पुढें आली होती, परंतु परदेशांतील भांडवल भारतामधील ह्या धंद्यांत गुंतवून घेण्यास तयार नाहीं अशी माहिती लोकसभेंत देण्यांत आली. भारतामधील प्रवासी हॉटेलांतीलं सुखसोयींचा दर्जा वाढविण्यासाठी कांहीं प्रमाणांत देशी हॉटेलमालकांशीं सहकार्य करण्याची तयारी मात्र दिसून येत आहे. येत्या कांहीं वर्षांत भारतांत येणाऱ्या परदेशीय हौशी प्रवाश्यांची संख्या बरीच वाढेल असा अंदाज आहे. त्या सर्वांची योग्य प्रकारानें सोय करावयाची तर १९६८ पर्यंत ५ हजारांवर खोल्यांची व्यवस्था व्हावी लागेल; आणि तें करण्यासाठी २५ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. परदेशी हौशी प्रवाश्यांना आकर्षित करून हुंडणावळ मिळण्याचे प्रयत्न अनेक देश करतात. स्पेन, इजिप्त, इत्यादि देशांच्या सरकारांनीं ह्या बाबतींत विशेष लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे.

---

### हृदयविकारासंबंधीं नवा दृष्टिकोण

मोठमोठ्या कंपन्यांचे बडे अधिकारी अथवा सरकारी बडे अधिकारी पुष्कळदा आकस्मिक मरण पावतात. त्यांच्या मरणाचें कारण अनेकदा हृदयविकार असें देण्यांत येतें. कांहीं वैद्यकीय तज्ज्ञांचे मतानें तर हृदयविकार आणि कॅन्सर हे आधुनिक संस्कृतीनें उत्पन्न केलेले खास रोग आहेत. ह्या रोगांचें निदान करून त्यांवर उपचार करण्याचे प्रयत्न जगभर चालू आहेतच. पण ह्या रोगांची, विशेषतः हृदयविकाराची, कारणमीमांसा करतांना लंडनमधील एका हृदयविकारतज्ज्ञानें स्वीकारलेला दृष्टिकोण कांहींसा नवा म्हणावयास पाहिजे. त्यांच्या मतानें शारीरिक हालचाली फारच कमी झाल्यामुळें शरीरांतील अवयवांचा पुरेसा वापर होत नाहीं आणि म्हणून हृदयविकारासारखे रोग उद्भवतात. शारीरिक हालचाल कमी करण्याची प्रथा आधुनिक यंत्रमय जीवनांत लहानपणापासूनच सुरू होते. हल्लीं मुलें शाळेला पायी जात नाहींत; घरच्या मोटारीनें जातात अगर सार्वजनिक मोटारीनें जातात. दुपारच्या वेळीं खेळण्याऐवजीं तीं दूरचित्रवाणी पाहात बसतात. परिणामी त्यांच्या स्नायूंची प्रसरणशीलता आणि आकुंचनशीलता कमी होत जाते आणि त्यांची छाती स्वच्छ मोकळ्या हवेनें कधींच भरली जात नाहीं. ह्या संवयी लहान मुलांच्यापुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहींत. मोठीं माणसेंहि आपल्या शरीराचा वापर बेताबेतानेंच करतात. कांहीं लोक फिरावयास जातात आणि गाडींतच हवा खात बसतात. दुसरे कांहीं चांगल्या हवेसाठी समुद्रकिनारीं जातात, पण आरामखुर्चीवर स्थिर पडून राहतात. इतर कांहीं लोक सांघिक खेळ बघण्यांत वेळ घालवितात. अशा लोकांनीं चालणें, बागकाम करणें, घोड्यावर बसणें, इत्यादी शारीरिक हालचालींच्या संवयी लावून घेतल्या तर हृदयाचा वापर पुरेसा होऊन संबंधित रोगांची भीति होणार नाहीं.

---

### शरावती विद्युत्-प्रकल्पाला मदत

शरावती विद्युत्-निर्मितीच्या प्रकल्पाला ३१ लाख डॉलर्सचें कर्ज मंजूर करण्याचें आंतरराष्ट्रीय विकास मंडळानें ठरविलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून प्रकल्पांतील ८ वे विद्युत्-निर्मिति यंत्र खरेदी करण्यांत येणार आहे.

## नैसर्गिक ज्वालाग्राही वायूचा वाढता उपयोग

खनिज तेलाचा उपयोग आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांचा उपयोग आधुनिक जीवनांत बद्धमूल होऊन बसलेला आहे. म्हणून तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याचे प्रयत्न सर्वच देश कमी अधिक प्रमाणांत करीत असतात. भारतांत ह्या बाबतींत करण्यांत येत असलेला प्रयत्न प्रसिद्धच आहे. ऑस्ट्रेलिया ह्या देशालाहि तेलाच्या बाबतींत परदेशांकडून होणाऱ्या पुरवठ्यावर अवलंबून राहावें लागतें. अलीकडे मात्र ऑस्ट्रेलियांत तेलाच्या शोधावर बराच जोर देण्यांत येत असून त्या कामांत यशहि मिळत आहे. तेलाचा शोध करतांना पुष्कळदा ज्वालाग्राही नैसर्गिक वायु सांपडतो. सुमारें १० वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलिआंतील तेलाच्या शोधकांना हा वायु म्हणजे एक अडचण वाटत असे. त्यांना तेल पाहिजे असे; नैसर्गिक वायु नको होता. परंतु गेल्या कांहीं वर्षांत जगांत खनिज तेलाची सुबत्ता झाली आहे. त्यामुळें नैसर्गिक वायूकडे बघण्याच्या वृत्तींत बदल झालेला आहे. ऑस्ट्रेलिआंतील मोठ्या शहरांना अशा वायूचा पुरवठा करण्याचे प्रयत्न होत आहेत. पृथ्वीच्या गर्भांत अशा वायूचा अमाप पुरवठा असावा असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. उत्तर आफ्रिकेंत नैसर्गिक ज्वालाग्राही वायूचा खूप मोठा साठा असून त्याचा उपयोगहि करण्यांत येऊ लागला आहे. नैसर्गिक वायूचा इंधनासाठी उपयोग करण्याचा धंदा इटली, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, कॅनडा आणि अमेरिका ह्या देशांत चांगला वाढीला लागला आहे. अलीकडे रशियांतहि तो पुढें सरसावला आहे. तथापि अमेरिका ह्या धंद्यांत पुढारलेली आहे. अमेरिकेंत २ लाख मैल लांबीच्या नळाच्या साह्यानें ह्या वायूचा पुरवठा करण्यांत येत आहे. अमेरिकेंत नैसर्गिक वायूचें वाहन नेणारे १०हजार मैल लांबीचे नळ दरसाल नव्यानें घालण्यांत येत आहेत.

## जागतिक व्यापारपरिषदेच्या सूचना

जगांतील अविकसित देशांची भरभराट घडवून आणण्यासाठी औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांनीं आपल्या उत्पन्नाचा अल्पसा भाग मदत म्हणून त्यांना द्यावा असा विचार अनेकदा व्यक्त करण्यात येतो. जिनीव्हा येथें भरलेल्या जागतिक व्यापारपरिषदेनें ह्या विषयासंबंधीं संयुक्त राष्ट्रसंघटनेला अलीकडे कांहीं सूचना व शिफारसी केल्या आहेत. जागतिक व्यापारपरिषदेचे ११९ सभासद आहेत. मागासलेल्या देशांना मदत देण्यासंबंधीं परिषदेने एक महत्त्वाचा ठराव मंजूर केला आहे. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांनीं आपल्या वट्ट उत्पन्नाचा एक टक्का भाग अप्रगत देशांना मदत देण्यासाठी राखून ठेवावा अशी शिफारस ठरावांत करण्यांत आली आहे. या शिफारसीला १०७ देशांनीं अनुकूल मत दिलें. विरोधी मत कोणत्याच देशानें दिलें नाहीं. परंतु सोव्हिएट रशिआच्या गटांतील सर्व देशांनीं मतच दिलें नाहीं. ह्याला अपवाद फक्त रुमानिआचा. रुमानिआनें ठरावाला अनुकूल मत दिलें. ह्या शिफारसीशिवाय आणखीहि कांहीं शिफारसी करण्यांत आल्या आहेत. त्यांपैकी कांहीं महत्त्वाच्या अशा आहेत (१) अविकसित देशांना देण्यात आलेल्या कर्जांची फेड सवलतीच्या अटीने करून घेण्याची तरतूद असावी. ही शिफारस एकमतानें मंजूर करण्यांत आली. (२) अविकसित देशांना देण्यात येणारी आर्थिक मदत त्या देशाला मान्य नसलेल्या कोणत्याहि प्रकारच्या राजकीय, आर्थिक, लष्करी अगर इतर अटींवर अवलंबून ठेवण्यात येऊन नये. सरकारी पातळीवर देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचे दर ३ टक्क्यापेक्षा अधिक असूं नयेत. (३) अविकसित देशांना त्यांना देण्यात आलेलीं कर्जें कच्च्या मालाच्या रूपांत अगर पक्क्या मालाच्या रूपांत फेडण्याची मुभा असावी.

## प्रभावी ध्वनिक्षेपक मिळविण्याचे प्रयत्न

१९६२ च्या ऑक्टोबर महिन्यांत चीननें भारताच्या उत्तर सीमेवर आक्रमण केल्यानंतर भारताची बाजू परदेशांत पटवून देण्याचे प्रयत्न नीटसे झाले नाहींत, अशी तक्रार लोकसभेंतहि करण्यांत आली होती. परदेशांतील भारताच्या वकिलाती हें काम कांहीं प्रमाणांत करीत असल्या तरी आकाशवाणीच्या साह्यानें भारताचा प्रचार अधिक प्रभावीपणें करतां येईल हें उघडच आहे. ह्या कामीं मुख्य अडचण म्हणजे शक्तिशाली ध्वनिक्षेपकाचा अभाव. अमेरिकेकडून असा १ हजार मेगॅवॅट शक्तीचा ध्वनिक्षेपक मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत. त्यानंतर ध्वनिक्षेपकासाठीं अनेक परदेशांकडून टेंडर्स मागविण्यांत आलीं होतीं. त्यांत रशिया आणि युगोस्लाव्हिआकडून टेंडर्स आलेलीं होतीं. रशियाकडून ध्वनिक्षेपक घेतला जाणार, अशी वार्ताहि मध्यंतरीं आली होती. झेकोस्लोव्हाकिआनें ध्वनिक्षेपकासाठी दिलेले टेंडर भारत सरकार मंजूर करील असा रंग दिसत आहे. आग्नेय आशिआंतील देशांना भारताचा प्रचार पोंचावा म्हणून झेकोस्लोव्हाकिआकडून ८०० मेगॅवट शक्तीचा ध्वनिक्षेपक घेण्यांत येणार आहे. झेक सरकारनें त्याची किंमत रुपयांच्या चलनांत घेण्याचें कबूल केलें आहे. भारत आणि झेकोस्लोव्हाकिया ह्यांच्यांत गेल्या मे महिन्यांत ४० कोटी रुपयांच्या कर्जासंबंधीं करार झालेला आहे. जरूर पडल्यास ह्या कर्जाच्या रकमेपैकी कांहीं हिस्सा ध्वनिक्षेपकाची किंमत चुकती करण्यासाठी वापरण्यांत येणार आहे. ध्वनिक्षेपक उभारण्याच्या कामीं आणि त्याचा वापर करण्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञांना शिकवून तयार करण्याच्या कामींहि झेक सरकार सहकार्य करणार आहे.

## भावनगर शहराचा पाणीपुरवठा

सौराष्ट्रामधील भावनगर शहराला उन्हाळ्यांत पिण्याच्या पाण्याची टंचाई कमीअधिक प्रमाणांत दरसाल सोसावी लागते. गेल्या उन्हाळ्यांत तर पाण्याचें दुर्भिक्ष फारच जाणवलें. सौराष्ट्रांतील शत्रुंजी नदीवर बांधण्यांत आलेल्या मोठ्या धरणाचें पाणी भावनगरला पुरविण्याची योजना आतां तयार झाली आहे. धरणापासून काढण्यांत आलेला एक कालवा शहरापासून ६ हजार यार्डांवरून जात आहे. ह्या कालव्यापासून मोठे नळ टाकून शहराला पाणीपुरवठा करणें शक्य आहे. ह्या कामासाठी लागणाऱ्या खर्चांतील आपला वाटा देण्याचें भावनगरच्या नगरपालिकेनें मान्य केलें आहे. कालव्यापासून नळ टाकण्याच्या कामाची पाहणी लवकरच सुरू होईल. १९६६ च्या जून महिन्यापासून शहराला शत्रुंजी नदीचें पाणी मिळू लागेल असा अंदाज आहे.

## गुजरातच्या बंदरांतून चालणारा व्यापार

गुजरातमधील बंदरांतून होणाऱ्या व्यापारांत १९६३-६४ सालीं ३·८ टक्क्यांनीं वाढ झाली आहे. ह्या वर्षी राज्यांतील बंदरांतून एकूण ३१ लाख, ४४ हजार टनांवर माल हाताळण्यांत आला. त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा हा माल १ लाख, १६ हजार टनांनीं अधिक आहे. १९६३–६४ सालीं बोटवाहतुकीनें ८ लाख, ७९ हजार टन माल परदेशीं पाठविण्यांत आला. १९६२–६३ सालीं हा आकडा ८ लाख टनांच्या आसपास होता. ही वाढ ९·८ टक्के भरते. परदेशांतून आयात केलेल्या मालांतहि अशीच वाढ झालेली दिसून येते. ह्या संबंधींचा १९६२–६३ चा आकडा १९६३–६४ च्या आकड्यापेक्षा सुमारें १२ हजार टनांनीं कमी आहे.

## आश्रयार्थींच्या सोयीसाठी मोठी योजना

पूर्व पाकिस्तानांतून भारतांत येणाऱ्या अल्पसंख्य लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न फार अवाढव्य आहे. पश्चिम बंगालमध्यें सर्वत्र निर्वासितांची सोय करणें अशक्य असल्यानें भारताच्या इतर घटक राज्यांत त्यांची सोय करण्यांत येत आहे. निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी नेमण्यांत आलेले मंत्री श्री. महावीर त्यागी ह्यांनीं त्यांची सोय लागण्यासाठी एक योजना तयार केली आहे. चंबळ नदीच्या खोऱ्यांतील जमिनीवर ३० हजार निर्घासित कुटुंबांची वसाहत करण्याचा त्यांचा विचार आहे. चंबळ, यमुना आणि माही नद्यांच्या खोऱ्यांत खोल घळया पडलेली आणि म्हणून ओसाड पडलेली सुमारे ५० लाख एकर जमीन आहे. ही सर्व जमीन लागवडीखाली आणता आली तर तें अनेक दृष्टींनीं उपयुक्त ठरणार आहे. ह्या ओसाड जमिनीची पहाणी करण्याचें काम चालू करण्यांत आलें आहे. माती उकरून जमीन सपाट करणारी मोठीं यांत्रिक फावडीं लावून हें काम करण्याची योजना मागें एकदां आखण्यांत आली होती, परंतु ती कागदावरच राहिली. निर्वासितांचें पुनर्वसन करण्याच्या निमित्तानें ह्या मोठ्या भूभागाचा कायापालट करण्याची संधि पुन्हां आलेली आहे. सर्व जमीन वसाहतीसाठी योग्य करण्याचें काम मोठ्या खर्चाचें असल्यानें मध्यवर्ती सरकारनेंच तें अंगावर घेण्याचें ठरविलें आहे. ओसाड पडून राहिलेली ही जमीन वसाहतीसाठी योग्य बनाविण्यांत आल्यास तिची धूप थांबेल, अन्नधान्याचें उत्पादन वाढविता येईल आणि हजारो लोकांना आसरा मिळून त्यांचें जीवन सुरळीत चालूं होईल.

---

## रशियांतील चर्चमध्यें वेदांतील प्रार्थना

रशियन व संस्कृत भाषेंतील साधर्म्य ह्या विषयावर बोलतांना राशिअन प्रा. श्रीमती पोटेबँको ह्यांनीं अशी माहिती सांगितली की रशियांतील एका चर्चमध्यें प्रार्थनेच्या वेळीं कांहीं वैदिक ऋचा म्हणण्यांत येत असल्याचें आढळून आलें आहे. ह्या चर्चमधील प्रार्थना इतर चर्चमधील प्रार्थनांपेक्षा वेगळ्या असल्याचें आढळून आल्यावरून तेथील पाद्रापाशीं त्याविषयीं चौकशी करण्यांत आली. त्यावेळीं ह्या प्रार्थना बापापासून मुलांना तोंडी शिकविण्यांत आल्या आहेत असें दिसून आलें. गेल्या कित्येक पिढ्यांपासून ही शिकवण चालूं आहे. प्रार्थना सांगणाऱ्यांना मात्र त्याची कल्पना नव्हती. अखेर हें रहस्य रशियांतील भाषाकोविदांनीं सोडविलें.

---

## ब्रह्मदेशांतील हिंदी नागरिकांची मालमत्ता

ब्रह्मदेशाच्या सरकारनें खाजगी व्यापारधंद्यांचें राष्ट्रीयीकरण केल्यापासून तेथील हिंदी व्यापारी भारतांत येऊं पाहात आहेत. त्यांच्याजवळ असलेल्या सोन्यानाण्यांबाबत आणि जडजवाहिरांबाबत भारत सरकार आणि ब्रह्मी सरकार ह्यांच्यांत वाटाघाटी चालूं आहेत. ब्रह्मदेशाच्या सरकारचें म्हणणें असें आहे कीं हिंदी नागरिकांजवळ असलेली अशा प्रकारची मालमत्ता त्यांना भारतांत परत नेतां येणार नाहीं. कारण, ही मालमत्ता त्यांनीं काळ्या बाजारांत मिळविली असण्याचा संभव आहे. तेव्हां त्यांनीं ती कशी मिळविली ह्याचा खुलासा त्यांना करतां आला पाहिजे. परंतु मालमत्ता ब्रह्मदेशांतच विकून आलेला पैसा तेथेंच गुंतविण्याचा त्यांचा इरादा असल्यास तसें करण्यास हरकत नाहीं. खुद्द ब्रह्मदेशांत मात्र परिस्थिति अशी आहे कीं, हिंदी नागरिकांना नुसतें जगावयाचें म्हटलें तरीसुद्धां तें मुष्कील आहे.


---

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ वैली
फाळ व सुटे भाग


तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्ट
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )


किर्लोस्कर
शेंगा यंत्रें
- कॉटेज हॅण्ड शेंगायंत्र
- कॉटेज हॅण्ड व पॉवर शेंगायंत्र
- कल्याण पॉवर शेंगायंत्र

घरगुती उपयोगासाठी, व्यापारासाठी, तेलगिरण्यांसाठीं अशा विविध उपयोगासाठीं लागणारीं लहानमोठीं शेंगायंत्रें तयार करून किर्लोस्कर कारखान्यानें असंख्य गृहिणी, व्यापारी व तेलगिरण्यांचे कारखानदार यांना कामाचा जलद उरक, खर्चात बचत व मालाचा जलद उठाव असा तिहेरी फायदा गेलीं अनेक वर्षें मिळवून दिला आहे.

सविस्तर माहितीसाठीं लिहा
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्करवाडी, जि. सांगली
STUSA KM 16/63

**शालेय विद्यार्थ्यांचा क्रिकेट संघ**—इंग्लंडमधील शालेय विद्यार्थ्यांचा एक क्रिकेट संघ ह्या वर्षी भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. त्यांचा दौरा ७ आठवड्यांचा असेल. विद्यार्थ्यांचा हा संघ दिल्ली, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास ह्या शहरांतून एकेक सामना खेळेल. अशा संघाचा हा पहिलाच परदेशीय दौरा आहे. असाच एक हिंदी विद्यार्थ्यांचा संघ परतभेट म्हणून इंग्लंडला जाणार आहे.

**हापूस आंब्यांची निर्यात**—रत्नागिरी जिल्ह्यांतून ५ हजार हापूस आंब्यांच्या पेट्या पश्चिम आशियांतील देशांना निर्यात करण्यांत आल्या. जिल्हा खरेदी-विक्री सहकारी संघानें सहकारी संस्थांमार्फत आंब्यांच्या रायांच्या मालकांना आगाऊ पैसे देऊन फळें खरेदी करण्याची व्यवस्था केली होती. चांगली किंमत मिळाल्यास पुढील हंगामांत निर्यात वाढविण्याचा संघाचा विचार आहे.

**जागतिक प्रदर्शनांतील हिंदी दालन**—न्यूयॉर्क येथें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांतील हिंदी दालन बरेच लोकप्रिय झालें आहे. गेल्या कांहीं दिवसांत हजारों प्रेक्षकांनीं दालनाला भेट दिली. त्यांत परदेशांचे कांहीं प्रतिनिधीहि होते. दररोज सरासरी ९ हजार लोक प्रदर्शनांतील हिंदी दालन पाहतात. प्रदर्शनांत मांडलेल्या मालाची विक्रीहि चांगली होते.

**हें वरदान ठरेल कीं शाप ?**—अमेरिकेंतील जॉन हॉपकिन्स विद्यापीठांतील जीवशास्त्रज्ञ प्रा. एन्. ग्लास ह्यांनीं असें भाकित केलें आहे कीं, इ. स. २००० च्या सुमारास शास्त्रीय प्रगतीमुळे सर्व संसर्गजन्य रोगांचें उच्चाटन होईल. माणसांची आयुर्मर्यादा वाढवितां येऊन सुदृढ आणि सशक्त वार्धक्यही शक्य करतां येईल. परंतु अनियंत्रितपणें वाढत जाणाऱ्या लोकसंख्येला पृथ्वीतलावर पुरेशी जागा मात्र मिळणें अशक्य आहे.

**फराक्का बंधाऱ्याचें काम**—फराक्का बंधाऱ्यासाठी ६० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. परंतु नवीन अंदाजाप्रमाणें खर्चाचा आकडा बराच वाढला आहे. बंधाऱ्याचें काम मागें पडलें आहे. कारण विजेचा पुरवठा अपुरा आहे आणि काम करण्यासाठी लागणाऱ्या परदेशी यंत्रसामग्रीची आयात करणें हुंडणावळीच्या टंचाईमुळें कठिण झालें आहे. यंत्रसामग्री आयात करण्यासाठी ८ कोटी रुपयांच्या हुंडणावळीची आवश्यकता आहे. आतां रशियाकडून यंत्रसामग्री मिळविण्याचा विचार करण्यांत येत आहे.

**रशियन विमानांची खरेदी**—चीननें रशियाकडून इल्युशिन १८ ह्या बनावटीचीं नागरी वाहतूक करणारीं ५ विमानें खरेदी केलीं आहेत. हीं विमानें बहुधा चीन व फ्रान्स ह्यांच्या दरम्यानच्या प्रवासासाठी वापरलीं जातील. ह्या मार्गावरील विमानें फ्रान्सकडून घेण्याच्या वाटाघाटी चीनचें सरकार करीत होतें. परंतु अखेर ४२ लाख पौंड देऊन रशियाकडून विमानें घेण्यांत आलीं. चीनच्या नागरी हवाई दलांत मुख्यतः रशियन बनावटीचींच विमानें आहेत. चीननें रशियाकडून विमानांचीं ३० एंजिनेंहि ३५ लाख पौंड देऊन खरेदी केलीं आहेत.

**कामधंदा करणाऱ्या स्त्रिया**—कामधंदा अगर नौकरी करणाऱ्या स्त्रियांविषयीं आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेनें आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. यावरून असें दिसून येतें कीं जगांत काम करणाऱ्या लोकांचीं जी संख्या आहे त्यांपैकी एकतृतिआंश स्त्रिया आहेत. १०० स्त्रियांपैकी २७ स्त्रिया सवेतन काम करीत असतात. रशिया आणि पूर्वयुरोपमधील देशांत तर हें प्रमाण आणखीच अधिक आहे. ह्या देशांतून काम करणाऱ्या लोकांपैकी ४० टक्के संख्या स्त्रियांची आहे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या अगर होणाऱ्या देशांत कामकरी स्त्रियांची संख्या वाढत जाते असा अनुभव आहे.




शीतल, झुळझुळीत,
आणि वापरायला
अत्यंत मनोरम व सुखद
ठाकरसी
फॅब्रिक्स
फॅशनसाठीं सर्वोत्तम पसंती
या कापडावर असें लेबल असतें
•SANFORIZED•

THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
● धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड
● धी क्राउन स्पिनिंग ॲन्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
● धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड

### ठेवींची माहिती पुरविण्याची बिगर-बँकिंग कंपन्यांवर रिझर्व्ह बँकेची सक्ती

ज्या बँका व संस्था जनतेकडून ठेवी घेतात किंवा बँकेच्या व्याख्येंत न बसतां बँकिंगच्या प्रकारचा व्यवसाय करतात, अशांच्या-वर देखरेख ठेवून त्यांच्या व्यवहारांचें नियमन करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला नुकताच मिळाला आहे. रिझर्व्ह बँक कायद्याच्या दुरुस्तीच्या ४५ (क) ह्या कलमान्वयें बिगर-बँकांना ती ते तक्ते पाठविण्यास, माहिती पुरविण्यास, ठेवींचा तपशील देण्यास, व्याजाचे दर कळविण्यास, सक्ती करूं शकते; त्यांच्या धंद्याचा तपशील मागवूं शकते. ह्या अधिकारान्वयें रिझर्व्ह बँकेनें १४ मे, १९६४ रोजीं तीन स्वतंत्र ऑर्डर्स काढल्या आहेत.

### जगांतील सर्वांत श्रीमंत स्त्रिया

मि. डेव्हिड गन्स्टन ह्यांनीं जगांतील सर्वांत श्रीमंत स्त्रियांची यादी केली आहे:—राणी एलिझाबेथ, राणी ज्युलीआना, बारबरा हटन, हेलेना रॉबिन्स्टीन, ॲगथा ख्रिस्ती, मादाम वेनिझलू सुमति मुरारजी, बेगम आगाखान, मादाम व्होल्टेरा आणि कौंटेस सफिल्ड.

### नागपूर येथें खेळांचा आखाडा

नागपूर म्युनिसिपल कॉर्पोरेशननें तेथील पटवर्धन मैदानावर विविध प्रकारचे खेळ खेळण्याच्या सोयी असलेला आखाडा बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या आखाड्यासाठी ३० लाख रुपये खर्च येणार असून त्याच्या बांधकामास पुढील महिन्यांत प्रारंभ होईल. प्रारंभ म्हणून दोन बॅडमिन्टन कोर्टें आणि दोन टेनिस कोर्टें तयार करण्यांत येतील. आखाड्यासाठी लागणाऱ्या खर्चा-पैकीं ५० टक्के रक्कम सरकारकडून मिळणार आहे. परंतु सरकार-कडून यावयाची रक्कम वेळेवर हातीं न आल्यानें बांधकाम लांबणीवर टाकण्यांत आलें होतें. बांधकाम सुरू केल्यावर सरकारी मदत हातीं येईल असा अंदाज आहे.

### छत्र्यांच्या किमती वाढल्या

भारतामधील मालाचा उपयोग करून बनविलेल्या छत्र्यांच्या किमती गेल्या वर्षापेक्षा ५० पैशांनीं वाढल्या आहेत. त्यांच्या किमती ५ रुपयांपासून ४० रुपयांपर्यंत आहेत. परदेशांतून आयात केलेल्या मालाचा उपयोग करून बनविलेल्या छत्र्यांच्या किमती ४० टक्क्यांनीं वाढल्या आहेत.


## उत्पादनवाढ हीच आजची निकड

★ शिवजयंतीच्या सुमुहूर्तावर यंदाची खरीप पीक उत्पादन मोहीम सुरू झाली.
उत्पादनवाढ करून वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागविणें व शेतीचा व्यवसाय किफायतशीर करणें असा ह्या मोहीमेचा दुहेरी उद्देश आहे.

★ या मोहिमेनिमित्त प्रत्येक ग्रामपंचायतीनें भाताच्या नर्सरीसाठी गांवांतील निदान एक एकर जमीन निवडावी. त्यासाठी लागणारें सुधारलेलें बीं, खत आणि कीडनाशक औषधें सांठवून ठेवावींत. हीं साधनें गट-विकास अधिकाऱ्यांकडून मिळवावीं. जमीन नांगरून गादीवाफे तयार करावेत. पाणीपुरवठा असेल तर गादीवाफ्यावर भाताचें रोप तयार करावें. या कामीं ग्रामसेवकांचा सल्ला घ्यावा. हीं कामें पावसाळा सुरू होण्यापूर्वीच पूर्ण करावींत.

★ सुधारलेल्या पद्धतीनें शेती करा ! ★ अधिक पीक काढा !
★ स्वतःचें कल्याण करून घेऊन राष्ट्रकार्यास मदत करा !
★ खरीप पीक मोहीम यशस्वी करा.

(प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन)

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## न्यूयॉर्क येथील जागतिक प्रदर्शनांत बँकेची शाखा

पांच खंडांत मिळून ३६ कचेऱ्या असलेल्या दि फर्स्ट नॅशनल सिटी बँक ऑफ न्यू यॉर्कनें, न्यूयॉर्क येथील जागतिक प्रदर्शनांत एक शाखा उघडली आहे. त्यांत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातच, पण परदेशी हुंडणावळीचे व्यवहार आणि जगांतील कुठल्याहि ठिकाणावरचे चेक वटविणें, हीं कामें ती करते. ह्या प्रदर्शनांत उघडण्यांत आलेली ही एकमेव बँक आहे. प्रदर्शनासाठी जगांतील सर्व देशांतून लोक येत असल्याकारणानें, स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन, पोर्तुगीज, जर्मन, हंगेरिअन, रशियन प्रभृति भाषा बोलणारे नोकर त्यांत मुद्दाम घेतले आहेत.

## चिनी कामगारांची हकालपट्टी

रशिया व चीन ह्यांच्यामधील वादंगांत मंगोलिआच्या सरकारनें रशिआला अनुकूल ग्रह दाखविला आहे. मंगोलिअन सरकारनें वादंग सुरू होण्यापूर्वी चिनी सरकारची मदत घेतलेली होती. मदतीच्या करारास अनुसरून हजारों चिनी तंत्रज्ञ मंगोलिआंत काम करीत होते. पण गेल्या कांहीं महिन्यांत मंगोलिआच्या सरकारनें चिनी कामगारांना व तंत्रज्ञांना मायदेशीं परत पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. हें परत पाठवणीचें काम यथाक्रम चालू असून आतांपर्यंत सुमारें ३,८०० चिनी कामगार मायदेशीं गेले आहेत. आणखी २ हजार तंत्रज्ञांना तरी माघारी जावे लागेल असा अंदाज आहे. चिनी कामगारांत बांधकाम करणाऱ्यांची संख्या सर्वांत अधिक होती. मंगोलिआच्या १२ विभागांत शाळा, कारखाने, इत्यादि इमारती बांधण्यांत ते गुंतले होते.

## गवती चहाच्या तेलाचें उत्पादन

केरळमध्यें गवती चहाची लागवड करून त्यापासून तेल मोठ्या प्रमाणावर तयार करण्यांत येतें व परदेशीं पाठविण्यांत येतें. अलीकडे ह्या तेलाचें उत्पादन वाढल्यामुळें त्याच्या किंमती उतरल्या आहेत. तेलाची निर्यात स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमार्फत होते. तेलाच्या उत्पादनावर नियंत्रण घातल्याखेरीज किंमतींची घसरगुंडी थांबणार नाहीं असें कॉर्पोरेशनचें मत आहे. तेलाच्या दर्जाप्रमाणें ७५० टन तेल विकत घेण्याचें कॉर्पोरेशननें मान्य केलें आहे. तेल गाळण्याची पद्धत अधिक शास्त्रशुद्ध केल्यास त्याचा दर्जा सुधारून उत्पादनाचा खर्चहि कमी करतां येईल असें तज्ज्ञांचें मत आहे.

## छोट्या आगगाडीच्या रूपानें स्मारक

नेपाळचे राजे महेंद्र ह्यांच्या जन्मदिनाच्या निमित्तानें भारतानें एक छोटीशी रेल्वेगाडी त्यांना भेट म्हणून देण्याचें ठरविलें होतें. भारतीय तंत्रज्ञांनीं केलेल्या ह्या छोट्या गाडीसाठी १ लाख रुपये खर्च आला आहे. ह्या गाडींतून छोटीं मुलें बसूं लागलीं म्हणजे पं. नेहरूंचें तें एक स्मारकच होणार आहे. नेपाळमधील कित्येक मुलांनींच काय पण मोठ्या माणसांनींहि अद्याप आगगाडी पाहिलेली नाहीं.

## भात सडण्याची सहकारी गिरणी

ठाणें जिल्ह्यांतील आदिवासी भागांत भात सडण्याची पहिली सहकारी गिरणी, तलासरी खेड्यांत काढण्यांत आली आहे. ह्या भागांतील लोकसंख्येंत आदिवासींचा भरणा ९५ टक्के आहे. आदिवासी लोकांना त्यांच्या पिकापासून जास्तींत जास्त फायदा मिळावा म्हणून ही गिरणी मुख्यतः काढण्यांत आली आहे.


श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.


| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९.९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १४.०४ „ |
| ठेवी | रु. | ३९९.४४ „ |
| खेळतें भांडवल | रु. | ४३७.२७ „ |

शाखा : फोर्ट, बंदर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकद्वरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.